**सर्व शासकीय कार्यालयामध्ये वाढदिवस व इतर वैयक्तिक कार्यक्रम साजरे न करणे बाबत.**

**परिपत्रक**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**
**सामान्य प्रशासन विभाग-१**
**जा.क्र/साप्रवि-१/रवका/ २४८/२०२५**
**अहिल्यानगर दिनांक- १८/०७ /०७/२०२५**

जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालयामधील अधिकारी / कर्मचारी यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ मधील तरतुदीनुसार, प्रत्येक शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्याने शासनाच्या नियमांनुसार आणि निर्धारित कार्यपद्धतीनुसार काम करणे आवश्यक आहे. तसेच अधिकारी / कर्मचारी यांनी शासनाच्या प्रतिमेला धक्का लागेल असे कोणतेही कृत्य किंवा वर्तन न करणे बंधनकारक आहे. अधिकारी / कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळ, साधने व जागेचा वापर फक्त शासकिय उद्देशासाठी केला जावा.

याअनुषंगाने कळविण्यात येते की, विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांनी शासकीय कार्यालयामध्ये आपले वैयक्तिक समारंभ वाढदिवस साजरा करणे, केक कापणे, सजावट करणे, मिठाई वाटणे, फुगे लावणे, फोटोशूट करणे ई. कृती शासकीय कामकाजात व्यत्यय आणतात. त्यामुळे वाढदिवस व इतर वैयक्तीक कार्यक्रम कार्यालयामध्ये साजरे करणेत येवु नयेत. सदर परिपत्रकातील सुचनांची अंमलबजावणी करावी व आपलेस्तरावर विषयांकीत परिपत्रकाचे उल्लंघण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर परिपत्रक अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या https://nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असुन त्यांचा सकेतांक क्रमांक **२०२५०७१८०४०१३१** असा आहे.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

(स्थळ प्रत मा. मु.का.अ. यांचे मान्यतेने )

प्रति, 1. खातेप्रमुख,जिल्हा परिषद अहिल्यानगर ------------(सर्व)
2. गट विकास अधिकारी,पंचायत समिती------------(सर्व)

प्रत :-माहितीस्तव सादर
1. मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.